A

# स्विकृती पत्राचा नमूना

क्रमांक:-

दिनांक:-

प्रति,
मा. सदस्य सचिव,
महाराष्ट राज्य महिला आयोग,
गृहनिर्माण भवन, पोट माळा,
म्हाडा बिल्डींग, कलानगर,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय:- कार्यशाळांना अनुदान देणेबाबत

संदर्भ:- १)महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची दि.२९.०५.२०१८ रोजीची जाहीरात
२)www.mscw.org.in या संकेत स्थळावरील निवड यादी.

महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने आमच्या कार्यशाळा / चर्चासत्र / शिबिर याची आपण निवड केल्याबाबत समजते. सदर काम करण्यासाठी आम्ही इच्छूक असून नियमानुसार सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहून उपक्रमाचे काम यशस्वीरित्या विहीत वेळेत पूर्ण करुन देण्यास आमची सहमती आहे.

आपले विश्वासू,

(                    )

सही व शिक्का

B

// स्त्रीशक्तितुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक:-ममआ-२०१८/काशिच/का-०३/२३३८
दिनांक:-०६.०८.२०१८

प्रति,
सेवाभावी संस्था / महाविद्यालय

विषय:- कार्यशाळा/शिबिर/चर्चासत्र यांना अनुदान देणेबाबत.
संदर्भ:- महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची दि.२९.०५.२०१७ रोजीची जाहीरात

उपरोक्त संदर्भाधिन जाहिरातीनुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत मागविण्यात आलेल्या कार्यशाळा/शिबिर/चर्चासत्र यांना अनुदान देणे संदर्भात आयोगामार्फत समिती गठित करण्यात आली होती. सदर छाननी समितीची बैठक दि.१६ व १७ जुलै २०१८ रोजी पार पडली. आपल्या कार्यशाळेला अनुदान देण्याची मान्यता समितीमार्फत देण्यात आली आहे. आयोगाचे पत्र संस्थेस प्राप्त होताच आपण आपली सहमती असल्यास प्रत्यक्ष महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय, मुंबई येथे खालील दिनांक व वेळेस कागद पत्रासोबत स्वत: अथवा जबाबदार प्रतिनिधीने उपस्थित राहावे. आपण उपस्थित न राहिलयास आपली निवड रद्द करण्याचा अधिकार आयोगाने राखून ठेवला आहे.

१) संस्थेच्या लेटर हेड वर स्विकृती पत्र, (मूळ प्रत), संस्था प्रमुख / महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या प्रति स्वाक्षरी व शिक्का.
२) अनुदान स्विकृतीकरीता:- अ) संस्थेच्या बॅक खातेदाराचे नांव, ब) खाते क्रमांक, क) बँकेचे नांव व पत्ता, ड) बँक शाखा, ई) आय एफ सी कोड, उ) रद्द धनादेशाची प्रत इत्यादी.
३) संस्थेच्या/महाविद्यालयाचे उपस्थित प्रतिनिधी यांनी अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | १०.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |
| २ | पुणे | १४.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |
| ३ | कोकण | १६.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |
| ४ | नाशिक | १८.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |
| ५ | नागपूर | २०.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |
| ६ | अमरावती | २३ व २४.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |
| ७ | औरंगाबाद | २८ व २९.०८.२०१८ | ११.०० ते ४.०० |

(डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव

C

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

## सदर कार्यशाळा/चर्चासत्र/प्रशिक्षणास खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे

१) सदर कार्यशाळा महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात यावी.

२) सहभागी व्यक्तींसाठी सुसज्ज, शासकीय सभागृह अथवा उपलब्ध सभागृह व अनुषंगिक व्यवस्था करण्यात यावी.

३) कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ मान्यवर मा.अध्यक्षा, सदस्या, सदस्य सचिव, अधिकारी राज्य महिला आयोग, तसेच संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, तसेच समाजातील मान्यवर यांच्या हस्ते उद्घाटन व मार्गदर्शन व्हावे. मा. अध्यक्षा महिला आयोग यांचा वेळ व दिनांकासाठी मा. अध्यक्षांच्या स्वीय सहाय्यक श्रीम. अरगेकर यांचेशी संपर्क साधावा. (फोन नं-०२२-२६५९०७३९ )

४) संबंधित विषयातील तज्ञ व्यक्तीस साधन व्यक्ती म्हणूण आपल्यास्तरावर निमंत्रित करावे.

५) कार्यशाळेच्या विषयानुसार सहभागी व्यक्ती यांना आपल्यास्तरावर बोलावण्यात यावे.

६) कार्यक्रमासाठी **महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई** या नावाचा ठळक अक्षरात उल्लेख असलेला बॅनर तयार करण्यात यावा.

७) "महिलांविषयी कायदे" या विषयी उदा. कौटुंबिक हिंसाचार अधि,२००५, कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ अधि २०१३, PCPNDT - १९९४, हिंदू वारसा हक्क, सायबर क्राईम अधि २०१५, अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६, POCSO, २०१२, तिहेरी तलाक इ. माहिती देण्यात यावी.

८) भारतीय दंड सहिता अंर्तगत महिलांविषयक कलमे जसे विवाह संबंधित कलमे ४९३, ४९४, ४९५, ४९६, ४७९, ४९८ (अ), ३५४, ३७६, ५०४, ५०६, ५०९, इ. कलमांबाबत माहिती देण्यात यावी.

पृ.क्र.मा.-२

९) महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकडून वित्तीय वर्ष २०१८-१९ या आर्थिक वर्षात विविध कार्यशाळा/चर्चासत्र/प्रशिक्षण वर्ग इत्यादी करण्यासाठी कार्यालयाने ठरविलेले अनुदान संबंधितांना खालीलप्रमाणे अदा करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

अ) आयोग कार्यालयाकडून ठरविण्यात आलेल्या कार्यशाळेच्या विषयाबाबत मंजूर झालेल्या अनुदानापैकी ५०% रक्कम आगाऊ स्वरुपात धनादेशाद्वारे अदा केली जाईल. अशा वेळी कार्यालयीन प्राधिकार पत्र, संस्थेच्या नावे रद्द धनादेश, हमीपत्र, लेटरहेड, स्टॅम्प, शिक्का इ. दस्तऐवज सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

ब) सदर आगाऊ ५०% रक्कम आपणांस प्राप्त झाल्यावर आपल्याकडून व्यवस्थित नियोजनाद्वारे तसेच आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुन कार्यशाळा आयोजित करण्यात यावी व अशा वेळी सदर कार्यशाळेसाठी उर्वरित ५०% रक्कम आपल्याकडून स्वबळावर/स्व:खर्चाने करणे आहे. खर्च केलेली ५०% रक्कम आयोग कार्यालयाकडून अंतिम रक्कम देताना अदा करण्यात येईल. मात्र उपयोगिता प्रमाणपत्र खर्च झालेल्या एकूण रक्कमेचे (१००% रक्कमेबाबत) सादर करण्यात यावे.

क) कार्यशाळा पार पाडल्यानंतर दहा दिवसांच्या आत सदर कार्यशाळेबाबतचा अहवाल, फोटो, व्हिडिओ क्लिप, सी.डी., खर्च झालेल्या पूर्ण रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र, झालेल्या खर्चाचे विवरणपत्र, संस्थेच्या नावे असणारा रद्द धनादेश इ. संस्थेच्या लेटरहेडवर सक्षम अधिकाऱ्याची मुळ स्वाक्षरी, स्टॅम्प (शिक्का), प्राधिकारपत्र इत्यादी सहित आयोग कार्यालयाकडे सादर केल्यावर, उर्वरित ५०% रक्कम (आपण केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती) अदा करण्यात येईल.

ड) कार्यशाळेबाबतचा कोणताही पत्रव्यवहार किंवा कागदपत्रे डाकबटवड्याद्वारे/पोस्टाद्वारे आयोग कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत. सदर कागदपत्रे प्रत्यक्षात आयोग कार्यालयात जातीने सादर करणे आवश्यक आहेत. पोस्टाने पाठविण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.

ई) कार्यशाळेबाबत केलेल्या खर्चास लेखाविषयक लेखापरिक्षणास खर्च करणारी व्यक्ती स्वत: जबाबदार राहील याची नोंद घेण्यात यावी.

फ) संबंधित कार्यशाळा माहे ऑगस्ट-२०१८ ते नोव्हेंबर-२०१८ या कालावधीत घेऊन जास्तीत जास्त दि. २०.१२.२०१८ पूर्वी कार्यशाळा पार पाडल्याबाबतची आवश्यक ती कागदपत्रे आयोग कार्यालयाकडे जमा करुन उर्वरित खर्च केलेली रक्कम आयोग कार्यालयाकडून घेऊन जाण्याची जबाबदारी आपली असेल.

ग) आवश्यक ती कागदपत्रे विहित नमुन्यात व आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यवाही न झाल्यास उर्वरित ५०% रक्कम किंवा काही हिस्सा अदा न करण्याचा अधिकार आयोग आपल्याकडे राखून ठेवण्यात येत आहे.

ज) वरीलबाबत ५०% आगाऊ रक्कम दिल्यानंतर आपणास देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार कार्यशाळेबाबत कार्यक्रम दिलेल्या वेळेत पूर्ण करुन वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे आयोग कार्यालयाकडे विनाविलंब सादर करुन आपणास देय असणारी उर्वरीत रक्कम आपल्या ताब्यात घेणे आवश्यक आहे.

१०) कार्यशाळेस आयोगामार्फत सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे त्या व्यतिरिक्त झालेल्या खर्चाची पूर्ण जबाबदारी संबंधितांची राहील. सदर बाबतचा खर्च हा शासनाच्या एकत्रित निधीतून करण्यात येणार असल्याने शासन वित्तीय नियमाच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा. झालेल्या कार्यशाळेचा अहवाल, कार्यक्रम संपल्यावर लवकरात लवकर जास्तीत जास्त दहा दिवसात कोणत्याही परिस्थितीत आयोगाकडे सादर करण्यात यावेत. सदर खर्चा बाबतच्या लेखा परीक्षणास संबंधित व्यक्ती जबाबदार राहील याची नोंद घेण्यात यावी.

११) या सर्व कार्यशाळांचे संपूर्ण सनियंत्रण व अंमलबजावणी आपल्या संस्थेमार्फत करण्यात यावे. कार्यशाळेनंतर **कार्यशाळा अहवाल, फोटो, काही व्हिडिओ क्लीप सीडी, उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) , कार्यशाळेनंतर १० दिवसांच्या आत आयोग कार्यालयास सादर करावीत.**

१२) कार्यशाळेकरीता स्थानिक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व जिल्हा समन्वयक (महाराष्ट्र राज्य महिला आयोग) यांच्या सोबत समन्वय साधावा.

१३) आयोगाच्या मा.अध्यक्षा, सदस्या, सदस्य सचिव, व अधिकारी/कर्मचारी कार्यशाळेसाठी येणार असल्यास त्यांच्याकरीता शासकीय निवास व्यवस्था करण्यात यावी.

१४) जिल्हा माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडून कार्यशाळेची मोठया प्रमाणात प्रसिध्दी करण्यात यावी.

१५) कार्यशाळा / चर्चासत्र यशस्वीरीत्या संपन्न झालेल्या कार्यशाळांचे उर्वरित ५० % निधी घेण्यासाठी आयोगाच्या कार्यालयात येण्यापूर्वी खालील कागद पत्रे आयोगाच्या dysec.mscw@gmail.com या ईमेल वर पाठविणे आत्यावशक आहे. १) संस्थेचे नाव, पत्ता आणि संपर्क, २) घेतलेल्या कार्यक्रमाची स्वरुप व दिनांक, ३) या कार्यक्रमासाठी आयोगाकडून मिळालेली मंजूरी रक्कम, ४) संबंधित व्यक्ती व त्यांचा संपर्क, तसेच खालील कागदपत्र ईमेल सोबत जोडावी. १) कार्यक्रम पत्रिका, २) संस्थेच्या लेटरहेडवर कार्यक्रमाचे सविस्तर वार्तांकन/अहवाल. ३) कार्यक्रमाचे फोटो व उपस्थितांची नोंदणी यांदी (फोन नं., पत्ता आणि ईमेल सहित.) कृपया नोंद घ्यावी की, जोपर्यंत प्रत्यक्ष फाईल सोबत वर उल्लेख केलेली कागदपत्रे व माहिती ऑनलाईन मिळत नाही. तोपर्यंत उर्वरित अंतिम अनुदान वाटप केले जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

१६) महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे मा. सदस्या यांची विभागवार माहिती खालील प्रमाणे आहे. कृपया कार्यक्रमास विभाग निहाय मा. सदस्यांना निमंत्रित करण्यात यावे.

| अ. क्र | सदस्यांचे नांव | विभाग | फोन नं. / ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा | सपूर्ण महाराष्ट्र | ९७६५०००१३३<br>vijayarahatkar@gmail.com |
| २ | श्रीमती नीता ठाकरे, सदस्या | विदर्भ | ९८२३३१३११९<br>neetathakre७०@gmail.com |
| ३ | श्रीमती गयाताई कराड, सदस्या | मराठवाडा | ९६२३४४३७२२<br>ganeshkarhad२२२२@gmail.com |
| ४ | श्रीमती विंदा किर्तीकर, सदस्या | कोकण | ९२२३३२२५५०<br>vindakirtikar@rediffmail.com |
| ५ | श्रीमती देवयानी ठाकरे, सदस्या | उत्तर महाराष्ट्र | ९८६०७८५७४० dhirendrast@gmail.com |
| ६ | ॲड्.श्रीमती आशा लांडगे, सदस्या | कोकण | ९८९२०८८९४६<br>advocateashalande@gmail.com |
| ७ | डॉ.मंजूषा मोळवणे, सदस्य सचिव | सपूर्ण महाराष्ट्र | ९९६७४३९१९१<br>memsecy.mscw@gmail.com |

(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव

1.

संस्थेचा
लोगो

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

## यांच्या सहयोगाने

-----------------------------संस्था ता.-------जि.--------

तर्फे----------------------------------------या विषयी एक दिवसीय

कार्यशाळा/चर्चासत्र/शिबिर

स्थळ :

दिनांक: